# जगावेगळा राजा

(कार्यकर्ता १ स्लो मोशन मध्ये धावत प्रवेश करतो.)

पात्र 1 : नमस्कार मंडळी, तोच मी, तोच मी, वरच्या आळीचा टिंब टिंब मंडळाचा कार्यकर्ता पात्र 1. (तेवढ्यात कार्यकर्ता २ स्लो मोशन मध्ये धावत प्रवेश करतो.)

पात्र 2 : नमस्कार मंडळी, मीच तो, मीच तो, खालच्या आळीचा, कोणत्याही मंडळाचा कार्यकर्ता, पात्र 2.

पात्र 1 - पात्र 2 : मंडळीहो, यंदाच्या देखाव्यात आम्ही बसवतोय महाराजांवरचं नाटक.

पात्र 2 : चल पात्र 1, प्रॅक्टिसला सुरुवात करु.

पात्र 1 : मंब्या, नाटकाची स्क्रिप्ट कुठंय?

पात्र 2 : आरं महाराजांचा इतिहास सगळ्यांना तोंडपाठ आहे. कशाला पाहिजे स्क्रिप्ट?

पात्र 1 : आस्सं. बरं काय काय दाखवणार त्यात?

पात्र 2 : (एक्शन करत) स्वराज्याचं तोरण, शाहिस्तेखानाची फजिती, अफजलखाचा वध, कोंढाण्यावर स्वारी अन बादशहाच्या हातावर तुरी यांसारख्या एकाचढ एक कथा मांडायच्या की झालं.

पात्र 1 : आरं तुला एवढेच महाराज माहिती आहेत की काय?

पात्र 2 : महाराजांच्या जीवनातील ह्याच तर प्रमुख घटना आहेत. सगळ्यांना हेच महाराज माहित आहेत. बरोबर की नाही मंडळी?

पात्र 1 : तरी म्हटलं (गुडघ्याला हात लावत) तू खालच्या आळीला का राहतो? आरं याच्या पलिकडे महाराजांचं वेगळं काय कार्य होतं पाहायचं का तुला?

पात्र 2 : यापेक्षा पण वेगळे महाराज तू दाखवणार? ठीक आहे. महाराजांसाठी काय पण !

पात्र 1 : ही १६७८ सालची घटना आहे. हे बेलवडी गाव. ती देसाईगढी जिंकायला महाराजांचा मेव्हणा सकुजी गायकवाड २७ दिवसांपासून लढतोय. या किल्ल्याची किल्लेदार आहे एक बाई. मल्लम्मा देसाई तिचं नाव. ते बघ मावळ्यांनी किल्ला जिंकला.

( सकुजी गायकवाड सावित्रीला जोरात स्टेजवर ढकलतो.)

सकुजी : हा..हा..हा..हा.. आता कसं वाटतंय. लई मस्ती ना तुझ्या अंगात. थांब तुझी सगळी मस्ती उतरवतो. (असं म्हणत तिच्या अंगावर जातो.)

सावित्री : नाही, मला सोडा.... वाचवा, वाचवा.... (सकुजी तिला आत ढकलतो. ती जोरात ओरडते. थोड्या वेळाने तिला शिवाजी महाराजांच्या समोर दरबारात सकुजी, सावित्री आणि इतर सरदार आहेत.)

महाराज : अगोदर बेड्या सोडा त्यांच्या. (सावित्रीला उद्देशून) आम्ही रयतेचं राज्य उभं करण्यासाठी झटतोय आणि तुम्ही आमच्या विरोधात शस्त्र हातात घेता?

सावित्री : ज्या राज्यात आयाबहिणींच्या इज्जतीला काडीचीही किंमत नाही ते कसलं रयतेचं राज्य?

महाराज : तुम्ही एवढा गंभीर आरोप आमच्यावर करता असं आम्ही केलं तरी काय? (सावित्रीला हुंदका दाटून येतो.) ताई, तुम्ही बोला.

सावित्री : आमच्या महिला सैनिकांना यांनी खूप मारहाण केली... आणि तुमच्या ह्या सरदारानं...

महाराज : (रागात) काय केलं यांनी?

सावित्री : माझा पाठलाग करुन पकडलं आणि भर रानात अब्रू लुटली माझी. काय शिक्षा करणार आता? कुठं गेली तुमची नितिमत्ता?

महाराज : तू रडू नको ताई. (रागात) सकुजी, हे खरं आहे का? (सकुजी शांत उभा राहतो.)

महाराज : सकोजीराव तू हे नीच कृत्य करावंस? काय वाटलं तुला? महिनोनमहिने झुंजणाऱ्या ह्या वाघीणीला हरवलंस म्हणजे तिची विटंबना करण्याचा अधिकार तुला मिळाला?

सकुजी : महाराज, एक डाव माफी द्या. ह्या मातीसाठी हवं तवा रगात सांडू आम्ही.

महाराज : रक्त सांडण्याची भाषा वापरणारा, अशी जीवाची माफी मागत नसतो. जीवापेक्षा इज्जत मोठी असते, तीच इज्जत तू मातीत मिळवलीस. मग तुझा हा जीव काय कामाचा?

सकुजी : मारू नका महाराज, मारु नका.

महाराज : हरामखोर, हजारवेळा आज्ञा देऊनही तुम्ही एका स्त्रीवर हात टाकला. ते ही एवढ्या पराक्रमी स्त्रीवर, जी सर्वांसाठी एक मोठी प्रेरणा आहे.

सकुजी : रागाच्या भरात हे झालं महाराज. क्षमा असावी महाराज.

महाराज : याला ह्याच बेलवडीच्या अंधार कोठडीत सडत ठेवा.

सकुजी : ह्या बारीला सोडा महाराज. खरं सांगतो पुन्हा असं होणार नाही.

महाराज : तुझ्या नजरांनी परस्त्री चा हव्यास धरला. हंबीरराव, तापलेल्या सळ्या घेऊन ह्या हरामखोराचे डोळे काढा. बेचिराख करा त्या नजरा!

सकुजी : ( सैनिक सकुजीला पकडतात.) (खाली धडपडत) सरकार, डोळं नका काढू सरकार. माफ करा, माहाराज. माफ करा. बायका पोरं उपाशी मरतील सरकार. सरकार, माफ करा सरकार. एवढ्या बारीला सोडा सरकार, माफी द्या.

सावित्री : महाराज, मी तुम्हांला चुकीचं समजले महाराज.

महाराज : जा, बाळाला घेऊन या. (सैनिक बाळाला घेऊन येतात. राजे त्या छोट्या बाळाला जवळ घेतात. सावित्रीचे काळीज धडधडत आहे. आता शिवाजी माझ्या मुलाला मारणार, असे तिला वाटले.)

सावित्री : महाराज, माझ्या लहान बाळाला मारू नका. हवं तर मला मारा.

महाराज : ताई..... घाबरू नका. कोण म्हटले आम्ही तुम्हांला मारणार. या बाळाला मारणार. तुम्ही मला बहिणीसारख्या. मग, हा बाळ माझा भाचा झाला ना. आज पहिल्यांदा मी माझ्या भाच्याला भेटतोय. काहितरी दिलं पाहिजे ना. ताई, या बाळाच्या

दुधभातासाठी ही जिंकलेली गढी त्याला देतोय. आणि आजूबाजूचा प्रदेश तुला चोळी - बांगडीसाठी ! (असं म्हणत त्यांनी बाळाला आईच्या हातात दिले.)

सावित्री : (आनंदाने डोळ्यांत अश्रू येतात) महाराज, मी तुम्हांला शत्रू समजले, वैरी समजले. पण तुमच्यासारखा राजा सगळीकडे असावा.

पात्र 1 : ही कथा इथेच संपत नाही. महाराजांचे जे पहिले शिल्प उभारले ते ह्या सावित्रीनेच आणि ते ही महाराजांच्या काळातच! (आपण सावित्रीच्या हातात शिल्प दाखवू शकतो.)

पात्र 2 : लय ग्रेट माणूस होता माझा राजा. त्यांनी रयतेच्या अब्रूची लय काळजी घेतली. रयतेच्या धर्माची काळजी घेतली.

पात्र 1 : आरं बापरे! तू नेमका कुठल्या पुस्तकातून इतिहास वाचतो?

पात्र 2 : आपण इतिहास वाचत बिचत नसतो. लय कंटाळवाणं असतं ते. आपण इतिहास ऐकतो, पाहतो आणि दुसऱ्यालाही पाठवतो. वॉट्सॲपवर.

पात्र 1 : तरी म्हटलं तुझ्या मेंदूचा एवढा कचरा का झालाय? धर्मासंबंधी नंतर बोलू. त्याअगोदर सांग, तेव्हा रयतेची, रयतेच्या शेतीची काय अवस्था होती हे तरी माहितीये का तुला?

पात्र 2 : लय त्रासात होती जनता. (गाणं सुरू होतं. त्याचवेळी वतनदार रयतेवर अन्याय करत आहेत. अन्याय -शेतकऱ्याचे पीक घेऊन जात आहेत. महिलांना त्रास.)

वतनदार ते रयतेवरती करीत होते मनमानी
फौजफाटा गडकोट बांधती शेतसारा वर लादुनी

(अन्याय झालेली रयत महाराजांसमोर उभी आहे.)

शेतकरी १ : महाराज, वतनदार आमच्याकडून भरमसाठ शेतसारा वसूल करतात. खायला अन्न राहत नाही.

शेतकरी २ : पाटलाच्या पोरीचं लग्न असलं की दुप्पट शेतसारा वसूल करतात.

शेतकरी १ : वतनदाराचे सैनिक आमच्या उभ्या पिकातून जातात महाराज. सगळं पिक नष्ट करतात.

शेतकरी २ : हेच वतनदार आमच्या आयाबहिणींची इज्जत दिवसाढवळ्या लुटतात.

महाराज : आजकालचे वतनदार हे पाटील, देशमुख, देशपांडे, कुलकर्णी स्वत:ला राजा समजतात. गड-कोट बांधून राहतात. रयतेवर जुलुम करतात. वतनदारांनी गड-कोट पाडून सामान्य रयतेसारखे रहावे. यांना नवी वतने इनाम म्हणून देऊ नये. नियमित पगार दिला जावा.

पात्र 1 : महाराजांनी वतनदाराला वेतनदार बनवलं आणि रयतेसाठी काय केलं बघ (गाणं चालू असताना महाराज बी-बियाणे, नांगर शेतकऱ्यांना देतात.)

औतकाठी अन बी-बियाणे रयतेसाठी पुरविली

दुष्काळाच्या संकटकाळी करमाफी हो राबवली

पात्र 2 : अंय असा कुठं इतिहास असतो का? जमीन दिली, बी-बियाणं दिली, नांगर दिला हा. इतिहास म्हणजे कसं पाहिजे. तलवार उपसली, खुपसली. असा अंगावर काटा आला पाहिजे.

पात्र 1 : इतिहासाकडं पाहायचा चष्मा बदल. असंच इतिहासाचं वाटोळं केलंय. फक्त रोमांचकारी घटना सांगायच्या आणि जे महत्त्वाचं कार्य आहे ते नजरेआड करायचं. जगात कुठल्याही राजाने रयतेची एवढी काळजी घेतली नाही. त्यांनी रयतेच्या कशाकशाची काळजी घेतली? ऐक.

स्वराज्याकामी गरज तुम्हा जर लाकूड फाट्याची

महाराज : (सैनिकांना उद्देशून) स्वराज्याच्या कामासाठी तुम्हांला एखाद्या लाकडाची गरज असेल तर शेतकऱ्याला राजी करुन एखादं वठलेलं झाड घ्यावं आणि.....

स्वराज्याकामी गरज तुम्हा जर लाकूड फाट्याची

घ्या राजी करुन अन किंमत देऊन आज्ञा शिवबाची

पात्र 2 : बापरे, महाराजांनी पोटच्या पोरासारखी शेतकऱ्याची काळजी घेतली. शेतकऱ्यांच्या पिकाची काळजी घेतली, आणि...

पात्र 1 : आणि?

पात्र 2 : आणि धर्माची काळजी घेतली.

पात्र 1 : पात्र 2, तू सगळं एकाच चष्म्यातून बघतोय आणि ते ही अर्धवट. तुला अफजलखानाची कथा माहितीये का?

पात्र 2 : माहितीये का? आरं तोंडपाठे, तोंडपाठ.. (त्वेषाने एक्शन करत) प्रतापगडच्या पायथ्याशी खान... (बेसूर म्हणत) आ आ आ आ आ... (पोट फाडायची एक्शन करत) असा कोथळा बाहेर काढला.

पात्र 1 : आरं असं पोट फाडून महाराजांना काय नरसिंह करतो का काय? अफजलखानाला मारल्यानंतर खानाचं पुढं काय झालं माहित आहे का?

पात्र 2 : त्याला मारल्यानंतर काय होणार? खान असा आडवा पडला. त्याला बोलता येत नव्हतं. हातपाय हालवता येत नव्हते. म्हणजे तो मेला होता.

पात्र 1 : आरं मेल्यावर तुझा काका बोलला होता का? पुढं काय झालं बघ.

सैनिक : महाराज, खानाची दोन पोरं पकडली आहेत.

महाराज : आणा त्यांना.

दोघेजण : हमें छोड दो. अब्बाजान से गलती हुई. जान बक्ष दो हुजुर.

महाराज : तुमच्या जीवाला इथे धोका नाही.

दोघेजण : खरंच.

महाराज : खान संपला. त्याच्याबरोबर आमचे वैरही संपले. स्वराज्याविरोधात लढत होता तोपर्यंत तो आमचा दुश्मन. आता मेलेल्याशी वैरभावना कसली.

सैनिक : पण हे पण वैरीच की.

महाराज : मुसलमान आमचा वैरी नाही. जो स्वराज्याच्या विरोधात तो आमचा दुश्मन. मग तो कुणीही, कोणत्याही धर्माचा असो. आपल्या सैन्यात नूरखान बेग आणि ७०० पठाणांची तुकडी आहे ना? खानाविरोधात तेही लढले. स्वराज्यासाठी ते अहोरात्र तलवार हातात धरतात. धरतात ना? पुन्हा असा धर्मभेद नको.

दोघेजण : वाह! क्या खयालात है.

महाराज : ( हात करत) तुमच्या अब्बाजानचे धार्मिक रिवाजानुसार दफन होईल. दिवाबत्तीची सोय करण्यात येईल आणि त्याचा सालाना खर्च सरकारातून करण्यात येईल.

स्वराज्यावरी चालून आला ठार केला हो खान
मृत्यूनंतर वैर संपलं केली कबर निर्माण
दिवाबत्ती लावा कबरीला दिलं त्यांनी फर्माण
आनंदाने नांदत होते हिंदू मुसलमान
शिवरायाच्या छायेखाली कधीच नव्हती वाण.
आनंदाने नांदत होते हिंदू मुसलमान

महाराज : ज्याचा जो धर्म असेल त्याने तो करावा, कुणीही त्यात भांडण उभं करु नये.

सर्वजण – छत्रपती शिवाजी महाराज की जय!

पात्र 1 : पात्र 2, महाराजांची आज्ञा काय आहे कळलं का?

पात्र 2 : आत्ताशी मला कळलं छत्रपती शिवाजी महाराजांकरता सगळ्या जाती धर्माची लोकं जीव द्यायला का तयार होती? माझ्या डोक्यात वेगळेच महाराज घुसले होते. महाराजांनी द्वेष नाही तर प्रेम वाटलं.

सर्वजण : ना जातीचे ना धर्माचे, शिवाजी राजे रयतेचे!